जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ११९ दिनांक - १९/०२/२०२५**

युनिट ६ गुन्हे शाखा पुणे शहर

## लोणी काळभोर पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू भट्टीवर केली कारवाई

दि.१८/०२/२०२५ रोजी पोलीस निरीक्षक श्री.वाहीद पठाण,स.पो.नि.मदन कांबळे स्टाफ असे कोंबिंग ऑपरेशन करत असताना स.पो.नि.मदन कांबळे यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की,ओढयाचे बाजुला रामदरा रोड येथील मोकळा रोड परिसरात इसम नामे मुकेश कर्णावत हा हातभट्टीची गावठी दारू तयार करत असले बाबत माहिती मिळाली सदर माहितीच्या अनुशंगाने लोणी काळभोर पोलीस स्टेशन कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राजेंद्र पन्हाळे,पोलीस उप-निरीक्षक अनिल जाधव व स्टाफसह शोध घेतला असता खालील नमुद मुददेमाल मिळुन आला असुन इसम नामे मुकेश कर्णावत अंधाराचा फायदा घेवुन जंगलात पळून गेला. सदर ठिकाणी १५०० लिटर तयार दारू १०० रु प्रति लिटर प्रमाणे एकूण १,५०,०००/-रू.ची तसेच २०,००० लिटर रसायन ५० रुपये प्रति लिटर प्रमाणे असे एकूण १०,००,०००/-रू.चे तसेच सदर ठिकाणी दारू करण्याचे साहित्य मोटार,ड्रम, एअर ब्लोअर,सरपण व इतर साहित्य असे एकुण ११,६०,०००/- रू.चा माल मिळून आला असून सदर बाबत कार्यवाही करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर आरोपीता विरुद्ध **लोणी काळभोर पो.स्टे.गु.र.नं.९८/२०२५ महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (फ)(क)(ई)** अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास कामी लोणीकाळभोर पो.स्टे. यांचे कडुन करण्यात येत आहे.

सदरची कामगिरी मा.अप्पर पोलीस आयुक्त गुन्हे श्री.शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री.निखिल पिंगळे,मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे २ श्री.राजेंद्र मुळीक यांचे मार्गदर्शना खाली गुन्हे शाखा युनिट ६ चे पोलीस निरीक्षक श्री.वाहिद पठाण, लोणी काळभोर पो.स्टे. कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राजेंद्र पन्हाळे, पोलीस उप-निरीक्षक अनिल जाधव, गुन्हे शाखा युनिट ६ कडील सहा.पोलीस निरीक्षक मदन कांबळे, पोलास अमंलदार बाळासाहेब सकटे,कानिफनाथ कारखेले,सुहास तांबेकर,ऋषीकेश ताकवणे,ऋषीकेश व्यवहारे,गणेश डोंगरे तसेच लोणीकाळभोर पोलीस स्टेशन कडील पोलास अमंलदार सातपुते,वनवे,वीर,योगेश पाटील, शिरगिरे यांनी केली आहे.


AIR BLOWER
GUJARAT

